नि.फौ.ख.क्र.२१०/२०१८
सरकार वि.देवराव
नि.क्र.२३

साक्षीदार क्र ०८ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–कांचन मोहन मांडसकर,
वय:–३९ वर्ष, व्यवसाय–घरकाम,
राह.पिपरा,ता.उमरेड,जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत</u>**

**१.** सन २०१८ साली मी पिपरा गावच्या सरपंच पदावर कार्यरत होते. घटना ही दि.२७/०८/२०१८ रोजीची आहे. देवरावजी मेंघरे यांनी आमच्या ग्रामपंचायतला शालीनी मेंघरे यांनी अतिक्रमणामध्ये घर बांधले आहे व सदर घर हे बैलबंडीच्या रस्त्यामध्ये आहे त्यामुळे सदर अतिक्रमण काढून टाकण्यासाठी अर्ज दिला होता. त्यानंतर आम्ही ग्रामपंचायत सदस्य,उपसरपंच,सदस्य आणि सचिव व मी असे चौकशीकामी देवरावजी मेंघरे आणि शालीनी मेंघरे यांच्याकडे पिपरा येथे गेलो होतो. त्यावेळी शालीनी मेंघरे हीने चौकशी होऊ दिली नाही. त्यावेळी ती बाई शिवीगाळ करित होती व माझे कोणीच काही करू शकत नाही व माझ्या घराला कोणी हात लाउ शकत नाही असे म्हणाली.

**२.** त्यानंतर पाउस आल्याने आम्ही साईडच्या घरी बसलो. त्यानंतर आम्ही पोलिस चौकशी करण्याकामी पोलिसांना बोलविले. त्यानंतर काय झाले हे मला माहीत नाही. पोलिस ज्यावेळी आले होते त्यावेळी मी माझ्या घरी गेली होती. पोलिसांनी माझी विचारपुस केली नाही. पालिसांनी माझे बयाण घेतले नव्हते. मी आरोपींना ओळखते. असे काही झाले नाही की, आरोपींनी फिर्यादीला मारपिट केली होती.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, दि.२७/०८/२०१८ रोजी मी सकाळी ११.०० वाजेच्या दरम्यान रस्ता मोकळा करण्याकामी व मोजमाप करण्यासाठी फर्यादीच्या घरी घटनास्थळावर गेले होते. त्यावेळी माझ्यासोबत ग्रामपंचायत,

सदस्य, सचिव इ. लोक होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी शंकर, देविदास, देविदासची पत्नी व मुलगा यांनी वादविवाद करून फिर्यादीला शिवीगाळ केली होती व मारण्याची धमकी दिली होती व फिर्यादीला माझ्यासमक्ष आरोपीने मारपीट केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी देविदास मेंघरे याचा पाय स्लीप झाला व तो खाली पडला त्यामुळे त्याच्या डोक्याला मार लागला होता. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.कु.के.एस.चिचघरे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.**

४. हे म्हणणे खरे आहे की, देविदास मेंघरे व शालिनी मेंघरे यांनी गावातील रस्त्यामध्ये बांधकाम केल्यामुळे त्या रस्त्याने गावक–यांना बैलगाडी कलवता येत नव्हती त्यामुळे गावक–यांनी ग्रामपंचायतकडे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रारीवरून आम्ही ग्रामपंचायत सदस्य चौकशीकामी फिर्यादीच्या घरी दि.२७/०८/२०१८ रोजी गेलो होतो. ज्यावेळी आम्ही फिर्यादीच्या घरी गेलो होतो त्यावेळी फिर्यादीने आम्हाला जागेची मोजणी करू दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी पाउस चालु होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी पाउस आल्यामुळे घटनास्थळावर चिखल होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर दोन्ही बाजुला नाल्या आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही जेव्हा अतिक्रमण काढण्यासाठी प्रयत्न केला त्यावेळी फिर्यादी व त्यांचे पति आरोपीच्या अंगावर धावुन गेले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी फिर्यादीचे पति हे घटनास्थळावर चिखल असल्यामुळे चिखलात पाय घसरून पडले व त्यामुळे त्यांच्या डोक्याला मार लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावामध्ये दोन राजकीय गट आहेत व त्यामध्ये शालीनी मेंघरे एका गटाच्या व आरोपी एका वेगळ्या गटाच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी यांचे पटत नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, आरोप व फिर्यादी यांचे वेगवेगळे राजकीय

गट असल्याने राजकीय वैर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी घटनास्थळावर होती त्यावेळी आरोपीने फिर्यादीला व तिच्या पतिला मारहाण केली नव्हती.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि०२.०५.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड